<u>महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२</u>

**शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन .**

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२०१२/प्र.क्र.१८२/क्रीयुसे-२,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : २४ डिसेंबर, २०१४.

<u>वाचा :-</u>

१. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीधो-१०९६ /प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१, दिनांक १२ नोव्हेंबर, १९९७.

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र. क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/क्रीयुसे-१, दिनांक १४ जून, २०१२.

<u>प्रस्तावना:-</u>

संदर्भाकित क्र. १ दिनांक १२ नोव्हेंबर १९९७ चा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याला क्रीडा संस्कृतीचा मोठा वारसा असून क्रीडा धोरण राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. तसेच क्रीडाविषयक पायाभूत सुविधा निर्माण व विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाने दि. १४ जून, २०१२ च्या शासन निर्णयान्वये आंतरराष्ट्रीय क्रीडा जगतातील घडामोडीचा वेध घेवून भविष्यात करावयाच्या कार्यप्रणालीसंबंधात क्रीडा धोरण-२०१२ जाहीर केले आहे. भारतीय शालेय खेळ महासंघद्वारा पुरस्कृत शालेय स्तरावर विविध खेळाच्या स्पर्धाचे आयोजन तालुका ते राष्ट्रीय स्तरापर्यन्त दरवर्षी करण्यात येते. विविध खेळांच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधी संघ/खेळाडू सहभागी होतात. शालेय विद्यार्थ्यामध्ये खेळाची गोडी निर्माण करुन त्यांच्यातील क्रीडागुण हेरण्यासाठी या स्पर्धाचा चांगला उपयोग होतो आणि यातूनच उत्कृष्ट खेळाडू निर्माण होतात. विशेषत: ग्रामीण भागातील युवकांना विविध खेळांच्या स्पर्धेत भाग घेण्याची संधी निर्माण व्हावी याद्दष्टिने क्रीडा स्पर्धानाही तितकेच महत्व आहे. विविध स्पर्धामधून राज्यातील उत्कृष्ट खेळाडूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेकरिता करण्यात येते.

क्रीडा धोरण २०१२ मध्ये या स्पर्धामध्ये भाग घेणाऱ्या खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था, ट्रॅक सूट, गणवेश व क्रीडांगणे तयार करणे इत्यादी बाबीवर होणारा खर्च लक्षात घेता अनुदानाच्या दरात वाढ करण्याची शिफारस आहे व त्या अनुषंगाने प्रचलित अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय:-**

1. शालेय क्रीडा स्पर्धामध्ये वाढीव अनुदान देण्याबाबत खालील अटी व शर्तीस अनुसरून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अ)** खालील स्पर्धांचा अनुदानासाठी समोवश असेल.

i. भारतीय शालेय खेळमहासंघाव्दारे पुरस्कृत शालेय स्पर्धा (या स्पर्धांमध्ये मान्यताप्राप्त विद्यालयातील १२ वीपर्यंतच्या १९ वर्षाखालील विद्यार्थी भाग घेऊ शकतात).

ii. इतर क्रीडा प्रकारांच्या राज्यस्तरापर्यंतच्या स्पर्धा.

वरील सर्व स्पर्धा तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरापर्यंत आयोजित करण्यात याव्यात.तसेच भारतीय शालेय खेळ महासंघाद्वारे महाराष्ट्रामध्ये नियत होण-या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे.

ब) <u>खेळाडूंची संख्या.</u>

i) तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावरील स्पर्धेतील खेळ व त्यात सहभागी होणारे खेळाडु, मार्गदर्शक व व्यवस्थापक यांची संख्या भारतीय शालेय खेळमहासंघ, आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे, यांचेद्वारा निश्चित केल्यानुसार राहिल.

ii) भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी एखाद्या नवीन खेळाचा समावेश केल्यास त्याखेळांच्या स्पर्धा राज्यात आयोजित करण्याचे अधिकार संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना राहतील.

**क)** <u>स्पर्धांचे आयोजन-</u>

i) शालेय तालुका व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे वेळापत्रक संबंधित जिल्हयाच्या जिल्हा क्रीडा परिषदेमार्फत व विभागीय व राज्य स्पर्धेच्या उपरोक्त क्रीडा स्पर्धेचे वेळापत्रक क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारे प्रत्येक वर्षी दिनांक २० जून, पर्यन्त प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या स्पर्धेतील राज्य व राष्ट्रीय प्राविण्यप्राप्त खेळाडू व शाळांची नावे क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावीत.

ii) ऑलिम्पिक स्पर्धेत अंतर्भूत असणारे महत्वाचे खेळ तसेच राज्यातील महत्वाचे पारंपारिक खेळ (ब-गट) यामध्ये (कबड्डी, खो-खो, कुस्ती व मल्लखांब) अशी वर्गवारी करण्यात यावी आणि ऑलिंपिकेतर मान्यताप्राप्त खेळ हे तिस-या गटात ( क-गट) असावेत.

iii) महाराष्ट्र राज्याला पुढील पाच वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करता येईल असे “ब” गटातील खेळ निवडून त्यांचा ”अ” गटात समावेश करावा व या खेळांवर विशेष लक्ष देऊन सर्व आवश्यक बाबींना प्राधान्य देण्यात यावे.

iv) महानगरपालिका क्षेत्रामधील शाळांना क्रीडा स्पर्धेसाठी स्वतंत्र जिल्हास्तर दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. राज्यतील काही महानगरपालिका अशा स्पर्धा आयोजनावरील खर्च करीत नाहीत. शालेय क्रीडा स्पर्धांची अंमलबजावणी प्रभावी

करण्यासाठी महानगरपालिकांना शासनाच्या आंतरशालेय क्रीडा स्पर्धाचे आयोजन बंधनकारक आहे.

| स्पर्धा | तालुकास्तर प्रति खेळ | जिल्हास्तर प्रति खेळ | विभागीयस्तर प्रति खेळ | राज्यस्तर प्रति खेळ | राष्ट्रीयस्तर प्रति खेळ |
|---|---|---|---|---|---|
| शालेय क्रीडा स्पर्धा | रु.१०,०००/- | रु.१५,०००/- (क्रीकेट, फुटबॉल, मैदानी स्पर्धा, जलतरण, कबड्डी, व खो-खो सोडुन) | रु.१५,०००/- | विशिष्ट नियमानुसार | रु.१०.०० लक्ष |
| शालेय क्रीडा स्पर्धा | | रु. ३०,०००/- (क्रीकेट,फुटबॉल, मैदानी स्पर्धा, जलतरण कबड्डी, व खो-खो या खेळांसाठी) | | | |
| राजीव गांधी खेल क्रीडा अभियान (ग्रामीण स्पर्धा) | सद्यस्थितीत या प्रकारातील क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी केंद्र शासनाच्या वतीने राजीव गांधी खेल क्रीडा अभियान योजना अंतर्गत राज्यास अनुदान वितरीत करण्यात येते त्यामुळे तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली नाही. | | | | |
| राजीव गांधी खेल क्रीडा अभियान (महिला स्पर्धा) | | | | | |
| इतर क्रीडा प्रकाराच्या राज्यस्तरापर्यंतच्या स्पर्धा. | शालेय क्रीडा स्पर्धांच्या विविध स्तरावरील आयोजनाचे दर लागू राहतील. | | | | |

ड) <u>अनुदानाचे दर</u>

उपरोक्त तक्त्यातील जिल्हास्तरीय स्पर्धासाठी अनुदान देतांना काही खेळांना अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याने अशा खेळांना अनुदान देतांना प्रत्यक्ष खर्चाचा विचार करून अनुदान देण्यात येईल. तर जिल्हयात प्रचालित असलेल्या खेळांना भरघोस प्रतिसाद असता अशा वेळी या स्पर्धाच्या आयोजनाचा खर्च अनुदान मर्यादेपेक्षा जास्त असतो. तेव्हा अनुदान मंजुर करताना त्याचाही

विचार करण्यात येईल. तसेच राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अनुदान विशिष्ठ नियमानुसार उपलब्ध करून देण्यात येईल. म्हणजेच या स्पर्धामध्ये सहभागी खेळाडूंच्या निवास व भोजनासाठी प्रति खेळाडू प्रति दिन रू. १५०/- प्रमाणे तर राज्यस्तरीय स्पर्धेच्या संयोजनासाठी प्रति खेळ रू. १,००,०००/- अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच राष्ट्रीय स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रति खेळ रू. १०,००, ०००/- इतके अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

इ) <u>खर्चाच्या बाबी :-</u>

वरील नियमानुसार तालुका, जिल्हा व विभाग स्तरावरील स्पर्धा आयोजनासाठी नमुद केलेल्या अनुदानातुन खर्च करावयाच्या बाबींमध्ये खेळाडु, व्यवस्थापक यांचा प्रवास, भोजन व निवास या बाबींच्या खर्चाचा अंतर्भाव नाही. यावर होणारा खर्च सहभागी होणाऱ्या शाळेच्या व्यवस्थापनाने करावयाचा आहे. हा खर्च शालेय शिक्षण विभागाकडून मिळणाऱ्या १२ टक्के निर्वाह अनुदानास ग्राह्य धरण्यात येईल. तसेच सदरहू बाबींवर होणारा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या उपलब्ध निधीतून करावा.

ई) <u>प्रवेश शुल्क :-</u>

सर्व शालेय क्रीडा स्पर्धासाठी प्रवेश शुल्क खालीलप्रमाणे आकारण्यात यावे. सदर शुल्क सबंधीत क्रीडा प्रकार आयोजनाच्या प्रथमस्तरावर करण्यात यावे.

i) प्रत्येक वयोगटातील प्रत्येक सांघिक खेळासाठी रु.५०/- ( रु.पन्नास) मुला-मुलींसाठी वेगवेगळे.

ii) प्रत्येक वयोगटातील प्रत्येक वैयक्तिक क्रीडा प्रकारातील प्रत्येक बाबींसाठी खेळासाठी रु.२५/- ( रु.पंचवीस) मुला-मुलींसाठी वेगवेगळे.

फ) राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी अनुज्ञेय अनुदानाचे दर-

शालेय क्रीडा स्पर्धांच्या राज्यस्तरीय स्पर्धा आयोजनसाठी तसेच ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धांच्या विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धा आयोजनसाठी पुढीलप्रमाणे अनुदान देय राहिल.

| खर्चाच्या बाबी | अनुदानाचे दर |
|---|---|
| खेळाडु व व्यवस्थापक यांच्या भोजन व निवास व्यवस्थेचा खर्च स्पर्धेच्या कालावधीसाठी तसेच निवड चाचणीच्या दोन दिवसांसाठी. | रु.१५०/- प्रतिदिन प्रति व्यक्तीप्रमाणे |
| पंच, सामनाधिकारी, वेळास अधिकारी, गुणलेखक, निवड समितीचे सदस्य तसेच स्पर्धा आयोजनासाठी आवश्यक इतर अधिकारी वर्गासाठी दैनिक भत्ता | अ) शासकीय सेवेतील व्यक्तींसाठी त्यांना देय असलेल्या व वेळोवेळी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार |

| | |
|---|---|
| | ब) अशासकीय व्यक्तींना दैनिक भत्ता रु.१५०/- प्रमाणे |
| पंच, सामनाधिकारी, वेळास अधिकारी, गुणलेखक, निवड समितीचे सदस्य तसेच स्पर्धा आयोजनासाठी आवश्यक इतर अधिकारी वर्गासाठी प्रवास भत्ता | अ) शासकीय सेवेतील व्यक्तींसाठी त्यांना देय असलेल्या व वेळोवेळी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार<br>ब) अशासकीय व्यक्तींना द्वितीय वर्गाचे रेल्वेभाडे किंवा प्रत्यक्ष एस.टी.भाडे. |
| सादिल खर्च<br>सादिल खर्चात खालील बाबींचा समावेश राहील.<br>१. स्थानिक वाहतुक व्यवस्था खर्च<br>२. लेखनसामग्री, छपाई व टपाल खर्च<br>३. वैद्यकीय सेवा<br>४. क्रीडांगण / हॉलचे देखभाल व भाडे<br>५. सबंधीत खेळाचे आवश्यक क्रीडा साहीत्य खरेदी.<br>६. विद्युत व्यवस्था, पाणी पुरवठा, स्वच्छता गृह व मजुरी.<br>७. उद्घाटन, समारोप समारंभ<br>८. पंचांचेमानधन. (त्या-त्या खेळाच्या प्रचलित नियमानुसार.)<br>९. इतर किरकोळ खर्च. | रु.१,००,०००/- |
| टिप : उपरोक्त बाबींवर होणारा अतिरिक्त खर्च त्या-त्या आयोजन समितीने प्रायोजकामार्फत करावा. | |

2. उपरोक्त अनुदान हे प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत राहील, तथापी विहित केलेल्या बाबनिहाय कमाल मर्यादेपेक्षा अधिक राहणार नाही. या स्पर्धेसाठी आवश्यक असलेले पंच, सामनाधिकारी, वेळाधिकारी व इतर आवश्यक अधिकारी वर्ग शक्यतो स्थानिक असणे आवश्यक आहे. राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा एखादया संस्थेने पुरस्कृत केल्या असतील तर शासनाकडून मिळणा-या अनुदानात पुरस्कृत संस्थेच्या खर्चाचा समावेश ग्राहय धरण्यात येऊ नये. स्पर्धेत भाग घेणा-यांची संख्या, क्रीडा प्रकार यांचा सारासार विचार करुन, संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी राज्यस्तरीय स्पर्धेचा कालावधी निश्चित करावा.

3. भारतीय शालेय क्रीडा महासंघाव्दारे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा तसेच नेहरु हॉकी व सुब्रतो मुखर्जी कप फूटबॉल राष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडू / संघ यांच्या सहभागावर होणाऱ्या ग्राह्यबाबी खालीलप्रमाणे राहतील.

अ) <u>राष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबीरासाठी खर्चाच्या बाबी:-</u>

i) खेळाडू, व्यवस्थापक व मार्गदर्शक यांचा प्रवास खर्च, निवासाच्या ठिकाणापासून प्रशिक्षणाच्या ठिकाणापर्यंत जाणे व येणेचे दुसऱ्या वर्गाचे रेल्वेभाडे किंवा प्रत्यक्ष एस .टी.भाडे शासकीय मार्गदर्शकांना शासकीय दराप्रमाणे देय असलेला प्रवास व दैनिक भत्ता देय राहील.

ii) खेळाडुंसाठी प्रवासातील हातखर्ची भत्ता (पॉकेट मनी) :- प्रवासाचा कालावधी १२ तासांपेक्षा जास्त असल्यास रु.१५०/- व त्यापेक्षा कमी असल्यास रु.७५/- प्रमाणे देण्यात यावा.

iii) निवास व भोजन खर्च :- खेळाडुंसाठी प्रत्येकी दर दिवशी रु.१५०/- प्रमाणे संपूर्ण सराव शिबीराच्या कालावधीसाठी.

iv) सादिल खर्च :- प्रत्येक क्रीडा प्रकारासाठी रु.१०,०००/-

ब) <u>राष्ट्रीय स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी खर्चाच्या बाबी :-</u>

i. खेळाडूंसाठी गणवेश :- प्रत्येकी रु. ५००/- (क्रीडा प्रकाराच्या गरजेनुसार )

ii. खेळाडू मार्गदर्शक व व्यवस्थापकांसाठी ट्रॅकसुट:- प्रत्येकी रु.१०००/- पर्यंत (क्रीडा प्रकाराच्या गरजेनुसार गणवेश व ट्रॅकसुटचा दर्जा व रंगनिश्चित करुन खरेदीबाबतच्या शासकीय पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करावयाचे अधिकार संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना राहतील.)

iii. प्रवास खर्च:-सराव शिबीराच्या ठिकाणापासुन राष्ट्रीय स्पर्धेच्या ठिकाणापर्यंत जाण्यायेण्याचे दुसऱ्या वर्गाचे सवलतीच्या दराचे रेल्वेभाडे किंवा एस.टी.भाडे (आरक्षणासह) यासाठी रेल्वेबोगीचे/एस.टी.आरक्षण यावर होणारा खर्च ग्राह्य धरण्यात येईल.

iv. खेळाडुंसाठी प्रवासातील हातखर्चीभत्ता (पॉकेट मनी ):- प्रवासाचा कालावधी १२ तासांपेक्षा जास्त असल्यास रु.१५०/- व त्यापेक्षा कमी असल्यास रु.७५/- प्रमाणे देण्यात यावा. (शासकीय मार्गदर्शकांना शासकीय दराप्रमाणे देय असलेला प्रवास व दैनिक भत्ता देय राहील.)

v. प्रवेश शुल्क :-भारतीय शालेय खेळ महासंघाने निश्चित केलेले प्रवेश शुल्क ग्राह्य धरण्यात येईल.

vi. स्पर्धेचा कालावधी :-राष्ट्रीय स्पर्धेचा प्रत्यक्ष कालावधी व स्पर्धेपुर्वी व नंतरचा एक दिवस असा एकुण कालावधी ग्राह्य धरण्यात येवुन या कालावधीत यजमान राज्याने निश्चित

केलेल्या दराप्रमाणे होणारा प्रत्यक्ष खर्च ग्राह्य धरण्यात येईल. राष्ट्रीय स्पर्धाकाळातील मार्गदर्शक व व्यवस्थापक यांना शासकीय दराप्रमाणे व नियमानुसार दैनिक भत्ता देय राहील.

vii. सादिल खर्चः- प्रत्येक क्रीडा प्रकारा साठी रु.१०,०००/- (सादिल खर्चाच्या बाबी- वैद्यकीय उपचार, हमाली, स्थानिक वाहतुक, आवश्यक क्रीडा साहीत्य, स्टेशनरी, दुरध्वनी, बोगीची साफसफाई इत्यादी)

viii. स्पर्धा कालावधीतील अल्पोपहार भत्ता:- राष्ट्रीय स्पर्धा कालावधीत खेळाडु, व्यवस्थापक व मार्गदर्शक यांना यजमान राज्याने किंवा भारतीय शालेय खेळ महासंघाने निश्चित केलेल्या दरानुसार अल्पोपहार भत्ता देण्यात येईल.

४. राज्याच्या संघासोबत प्रमुख व्यवस्थापक, मार्गदर्शक, रोखपाल व शिपाई इत्यादिंची नियुक्ती करण्याचे अधिकार आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

५. तालुकास्तर ते राष्ट्रीय स्तरापर्यंत शालेय क्रीडा स्पर्धासाठी नियमानुसार अनुदान मंजुर करण्याचे अधिकार आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

६. तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धेच्या मंजुर अनुदानासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी यांना, विभागीय क्रीडा स्पर्धांच्या मंजुर अनुदानासाठी सबंधीत विभागाच्या उपसंचालक यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन प्राधिकृत करण्यात येत आहे. तथापि, राष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबीर, राष्ट्रीय स्पर्धा व राष्ट्रीय स्पर्धा सहभागासाठी मंजुर केलेल्या अनुदानासाठी आहरण व संवितरण अधिकारी प्राधिकृत करण्याचे अधिकार आयुक्त / संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना राहतील.

७. सदर शासन निर्णय पुढील शैक्षणिक वर्षापासून आयोजित होणा-या शालेय क्रीडा स्पर्धांना लागू राहील

८. या प्रयोजनार्थ होणारा खर्च खालील लेखाशिर्षामधून त्या-त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

मागणी क्र. ई - ३

२२०४-क्रीडा व युवक सेवा,

००

१०४-क्रीडा व खेळ,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजना

(०५)-राज्य संघाची प्रतिनियुक्ती

(०५) (०८) शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन (२२०४-५६३५).

सदरहू शासन निर्णय, नियोजन विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२१/व्यय-५ दिनांक १६.०२.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०१०११७०६१९२१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRADHAN PRASHANT SURYAKANT

Digitally signed by PRADHAN PRASHANT SURYAKANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=PRADHAN PRASHANT SURYAKANT
Date: 2015.01.01 17:14:36 +05'30'

**( प्र. सु. प्रधान )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई,
३. आयुक्त, शालेय शिक्षण, पुणे
४. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. संचालक, (प्राथ./माध्य./उच्च.माध्य.), पुणे
६. आयुक्त (सर्व) , महानगरपालिका.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
८. महालेखापाल (लेखा व परिक्षा ),महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
९. नियोजन विभाग (का.१४७१ )मंत्रालय, मुंबई
१०. वित्त विभाग ( व्यय-५), मंत्रालय, मुंबई
११. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सर्व उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा (संचालनालयमार्फत),
१३. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयमार्फत),
१४. सर्व शिक्षणाधिकारी, (प्राथ./माध्य.)
१५. सर्व एकविध खेळांच्या संघटना (आयुक्त क्रीडा व युवक सेवा, संचालनालय यांच्या मार्फत)
१६. ग्रंथपाल,विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
१७. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
१८. निवड नस्ती (क्रीयुसे-१,क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३)